# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १३०/२००७/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. शहाबुद्‌दीन अमीन मगदुम,<br>रा. सावंतपूर वसाहत, पोष्ट– किर्लोस्करवाडी,<br>तालुक–पलूस, जिल्हा–सांगली. | तक्रारदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता(का) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली.<br>२) कार्यकारी अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु शहर विभाग, हिराबाग वॉटर वर्क्स जवळ, सांगली<br>३) उपकार्यकारी अभियंता (संवसु),<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु उपविभाग, वसंतदादा औद्यागिक वसाहत,<br>माधवनगर, जि. सांगली.<br>४) शाखाधिकारी,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु उपविभाग, वसंतदादा औद्यागिक वसाहत,<br>माधवनगर, जि. सांगली.<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे | विरूध्द पक्षकार |

**कोरम :–** १) श्री. के.व्ही. पाटील, अध्यक्ष
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य
३) श्री. बी.डी. नाईकवाडी, सदस्य–सचिव

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

श्री. शहाबुद्‌दीन अमीन मगदुम, रा. किर्लोस्करवाडी, ता पलूस, जि. सांगली यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, सांगली येथे विहित नमुन्यांत अर्ज करून नवीन कनेक्शन मिळण्याबाबत तक्रार दाखल केली होती. त्याकामी कक्षाने दि. १२–६–२००७ रोजी पारीत केलेला आदेश मान्य न झाल्याने प्रस्तुतचे अपील मंचामध्ये दाखल केले आहे.

अपीलदार यांच्या तक्रारीचे स्वरूप खालील प्रमाणे असल्याचे दिसून येते.

श्री. मगदुम यांनी वसंतदादा को–ऑपरेटिव्ह इंडस्ट्रीयल इस्टेट, सांगली येथील स.नं. १९५ व १९६ पैकी प्लॉट नं. ३ व ४ ची मिळकत लिलावामध्ये विकत घेतली. त्यानंतर त्यांनी वि.प. यांचेकडे घरगुती वापरासाठी सिंगल फेज नवीन वीज कनेक्शन मिळण्याबाबत दि. १७–७–२००६ रोजी अर्ज केला आहे. तथापि त्यांना अद्यापही वीज कनेक्शन मिळाले नाही. ते त्वरित मिळावे अशी त्यांची मागणी आहे.

प्रकरणी सुनावणीची तारीख दि. १७–८–२००७ रोजी कोल्हापूर येथे मंचाचे कार्यालयात नेमली होती. त्यावेळी अपीलदार श्री. मगदुम, त्यांचे प्रतिनिधी श्री. पारकर व वि.प. यांचे वतीने श्री. जेधे, कार्यकारी अभियंता तथा नोडल ऑफीसर, श्री घोलप, कार्यकारी अभियंता, सांगली शहर विभाग, हे उपस्थित होते. त्यावेळी अपीलदार श्री. मगदुम यांनी असे सांगितले की वसंतदादा को–ऑपरेटिव्ह इंडस्ट्रीयल इस्टेट, सांगली येथील स.नं. १९५ + १९६ पैकी प्लॉट नं ३ व ४ ही मिळकत मुळ मेसर्स किर्ती स्टील रि–रोलिंग मिल्स या कंपनीच्या मालकीची होती. सदरची मिळकत स्टेट बँक ऑफ इंडियाकडे कर्जापोटी गहाण होती. या कर्जाची वसुली करण्यासाठी बँकेने D.R.T. मध्ये दावा दाखल केला. त्यानुसार D.R.T. चे वसुली अधिका–याने या मिळकतीचा लिलाव केला. सदरच्या लिलावांत त्यांनी ही मिळकत विकत घेतली. त्याचे सेल सर्टिफीकेट (दि. २७–३–२००६) त्यांचे नांवे मिळाले आहे. या मिळकतीचा D.R.T.चे रिकव्हरी ऑफीसरने लिलाव केल्याचेवेळी त्यावर वीज मंडळाच्या थकबाकीचा कोठेही बोजा नोंदविलेला नव्हता. त्यामुळे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कर्जाची रक्कम सोडल्यास ही मिळकत निर्वेध, निष्कर्जी, व बिनबोजाची असल्याची समजूत होऊन त्यानी ही मिळकत खरेदी केली आहे. श्री. मगदुम यांनी पुढे असे सांगितले की सदरचे मिळकतीवर नवीन कनेक्शन मिळण्यासाठी वि.प. कडे अर्ज केला असता " पूर्वीची किर्ती स्टील रि–रोलिंगची थकबाकी आहे ती पूर्ण भरल्याची पावती व उपविभाग माधवनगर यांचा दाखला प्राप्त झाल्यानंतर आपला अर्ज स्विकारला जाईल " असे कनिष्ठ अभियंता यांनी त्यांना कळविले आहे. त्यानंतर त्यांनी वि.प. यांना वेळोवेळी भेटून सांगितले की वीज बिलाची थकबाकी भागविण्याची जबाबदारी ही पूर्वीच्या ग्राहकाची आहे. आम्ही लिलावामध्ये सदरची मिळकत खरेदी केली असल्याने आमच्यावर त्याची कायद्याने जबाबदारी टाकतां येणार नाही. मे. किर्ती स्टील रि–रोलिंग मिलकडून वीज कंपनीची अगर अन्य कुणाची येणे बाकी असेल तर D.R.T. चे रिकव्हरी ऑफीसरने मिळकत लिलाव केली तेंव्हा त्याने पुढे येऊन आपला क्लेम मांडणे आवश्यक होते. तसे वीज कंपनीने केलेले नाही. ही वस्तुस्थिती विचारांत घेऊन आम्ही मागणी केल्याप्रमाणे सदरचे मिळकतीस नवीन वीज कनेक्शन विना विलंब देण्यांत यावे अधीक्षक अभियंता, सांगली यांचेकडील दि. १६–९–२००६ चे पत्राबाबत श्री. मगदुम यांनी असे सांगितले की त्या पत्रांतील सूचनेनुसार व सहकार्याचे दृष्टीने त्यांनी रू. ९०,०००/– चा भरणा वि.प. कडे केला आहे. तरीही त्यांना अद्यापी नवीन वीज कनेक्शन मिळालेले नाही. मेसर्स किर्ती स्टील रि–रोलिंग मिल कडील थकबाकी वसुल करण्यासाठी वीज कंपनीने दिवाणी कोर्टात स्पेशल सिव्हील सूट नं. १०३/१९८५ चा दाखल केला होता. त्याचा निकाल दि. ४–२–१९९१ रोजी वीज कंपनीचे बाजूने झाल्याचे आपल्या माहितीत आहे असे श्री. मगदुम यांनी सांगितले. तथापि त्यानंतर म्हणजे सन २००६ मध्ये D.R.T. मार्फत या मिळकतीचा लिलाव होऊन आम्ही ही मिळकत खरेदी केली आहे. आमचा या दिवाणी दाव्याशी कसलाही संबंध नाही. नवीन वीज कनेक्शनची मागणी वितरण कंपनीकडे केली असता कंपनीने त्यास दाद दिली नाही. त्यामुळे त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्षांमध्ये विहित नमुन्यात तक्रार दाखल केली. त्याकामी कक्षाने दि. १२–६–२००७ रोजी आदेश पारीत करून मुख्य अभियंता (वाणिज्य) यांचे परिपत्रक क्र. ५२ दि. ७–५–२००७ प्रमाणे रू. १३,००,०००/– एक रकमी भरण्यास आम्हाला कळविले आहे. सदरचा निर्णय आम्हास मान्य नसल्याने आम्ही मंचामध्ये प्रस्तुतचे अपील दाखल केले आहे.

वि.प. यांचेवतीने श्री. घोलप, कार्यकारी अभियंता, शहर विभाग, सांगली यांनी असे सांगितले की या मिळकतीचे मुळ मालक मेसर्स किर्ती स्टील रि–रोलिंग मिल यांचेकडील थकबाकी वसुलीसाठी कंपनीने दिवाणी कोर्टात दावा क्र. १०३/८५ दाखल केला होता. त्याकामी सिव्हील जज्ज, सिनीअर डिव्हीजन सांगली यांनी दि. ४–२–१९९१ रोजी

आदेश पारीत करून दाव्यातील प्रतिवादी क्र. १ (मे. किर्ती स्टील) यांचेकडून रू. ७,९२,०६२=६५ ची थकबाकी वार्षिक हप्ता रू. १,००,०००/– व त्यावरील ६% वार्षीक व्याज प्रमाणे वसूल करण्यास वीज कंपनीचे बाजूने डिक्री बहाल केली. त्यास अनुसरून वीज कंपनीने थकबाकी वसुलीसाठी मा. सिव्हील जज्ज, सिनियर, डिव्हीजन, सांगली यांचे कोर्टात स्पेशल दरखास्त नं. ४८/९५ चा दावा दाखल केला. सदरचे मिळकतीमध्ये हक्क, संबंध असल्याने आपणास दरखास्त दाव्यांत पक्षकार करून घेण्यासाठी श्री. मगदुम यांनी या दिवाणी कोर्टात अर्ज दाखल केला होता. ही बाब तक्रारदार याने हेतु:पुरस्सर मंचापासून दडवून ठेवली आहे. या दरखास्तीच्या दाव्याचा निकाल अद्यापि लागलेला नाही. दरखास्तीचा दावा प्रलंबित असतांना स्टेट बँक ऑफ इंडियाने मेसर्स किर्ती स्टील प्रा.लि. यांचे विरूध्द कर्जाचे वसुलीसाठी ऋण वसुली अधिकरण (Debt Recovery Tribunal) पुणे यांचेकडे सन २००१ मध्ये वसुली याचिका (Recovery Petition) दाखल केली. त्याकामी अधिकरणाने जाहीर नोटीस देऊन सदरची मिळकत लिलावास काढली. ही बाब वीज मंडळाच्या नजरेस आल्याबरोबर अधीक्षक अभियंता, सांगली यांनी अधिकरणास प्रकरणी असलेली वस्तुस्थिती कळविली. त्यांनी अधिकरणाचे निदर्शनास असेही आणून दिले होते की वीज मंडळाच्या थकबाकीचा बोजा या मिळकतीवर नोंदविलेला आहे. वसुली अधिकारी, डी.आर.टी., पुणे यांनी अधीक्षक अभियंता, सांगली यांना दि. १७/९/२००४ रोजी पत्र पाठवून सदरचे मिळकतीवर वीज मंडळाची असलेली थकबकी अधिकरणास कळवावी म्हणजे त्याचा विचार लिलावाचेवेळी करतां येईल असे कळविले. त्यास अुसरून दि. २९/९/२००४ रोजी वीज कंपनीने वसुली अधिकरणास पुढे अशी विनंती केली की मेसर्स किर्ती स्टील मिल्स लि. यांचेकडील वीज मंडळाची थकबाकी रू. ३६,६८,४०१=६४ वसुल करून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास सहकार्य करावे. सदरची मिळकत तक्रारदाराने लिलावात खरेदी केल्याचे दिसून येते. त्यांनी दाखल केलेल्या प्रमाणपत्रावरून (Sale Certificate) सदरच्या मिळकतीचा लिलाव दि २४/२/२००६ रोजी होऊन तो अपीलदार श्री. शहाबुद्‌दीन अमीन मगदुम यांचे नांवे दि. २७/३/२००६ रोजी कायम करण्यांत आला असल्याचे दिसून येते. स्टेट बँक ऑफ इंडियाने मे. किर्ती स्टील्स विरूध्द वसुलीसाठी ऋण वसुली अधिकरणामध्ये याचिका दाखल केली त्यावेळी अधिकरणाने काढलेल्या जाहीरनाम्यामध्ये असे स्पष्ट नमुद केले आहे की लिलावातील खरेदीदार हे म्युनिसिपल कार्पोरेशन, गव्हर्नमेंट, सेमीगव्हर्नमेंट, कार्पोरेट बॉडीज इत्यादीची मागील थकबाकी देण्यास व इतर सर्व टॅक्सेस भरण्यास बांधील राहील. यावरून स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कर्जाची रक्कम सोडल्यास ही मिळकत निर्वेध, निष्कर्जी व बिनबोजाची असल्याचे समजून लिलावांत ही मिळकत खरेदी केली असल्याचे अपीलदाराचे म्हणणे चुकीचे, खोटे तसेच वस्तुस्थितीस धरून नसल्याचे दिसून येते. मिळकतीचा लिलाव दि. २४/२/२००६ रोजी केल्याचे अगोदर म्हणजे दि. २६/११/२००४ रोजी या मिळकतीवर दिवाणी कोर्टाचे हुकुमनाम्यानुसार रू. ७,९२,०६२/– इतक्या रकमेचा बोजा चढविण्यांत आला होता. अपीलदाराने सदरची मिळकत रू. ३५,७५,०००/– किंमतीस लिलावात विकत घेतांना या मिळकतीचे रेकॉर्ड पहाणे गरजेचे होते. त्यांनी तसे केलेले नाही. त्यासाठी वीज मंडळाची आर्थिक नुकसान करण्याचे कांहीही कारण नाही. शिवाय अपीलदाराने मुळ मालकाकडील येणे थकबाकी बाबत निर्णय होण्यासाठी (One time settlement) रू. ९०,०००/– वि.प.कडे भरणा केल्याचे अधीक्षक अभियंता, सांगली यांना दि. १६/१०/२००६ रोजी कळविले आहे. यावरून अपीलदार यांना वीज मंडळाच्या थकबाकीचे ज्ञान होते असे स्पष्टपणे दिसून येते त्यामुळे प्रकरणी विद्युत कायदा २००३ कलम ४३ व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ चे कलम १०.५ मधील तरतूदी लागू होत नाही. सबब अपीलदार यांनी कक्षाचे आदेशानुसार रू. १३,००,०००/– एक रकमी भरणा केल्यास वि.प. त्यांना नवीन वीज कनेक्शन देण्यास तयार आहेत.

सुनावणीचेवेळी अपीलदार यांचे वतीने प्रतिनिधी श्री. पारकर, वि.प. यांचे वतीने सर्वश्री घोलप, व जेधे यांनी केलेले कथन व उपलब्ध असलेले कागदपत्र यावरून प्रकरणी खालील प्रमाणे परिस्थिती असल्याचे दिसून येते.

वसंतदादा को–ऑपरेटिव्ह इंडस्ट्रियल इस्टेट, सांगली येथील स.न. १९५+१९६ पैकी प्लॉट नं. ३ व ४ ही मिळकत मुळ मेसर्स किर्ती स्टील रि–रोलिंग मिल्स लि. यांचे मालकीची होती. या मिलला वि.प. यांनी सन १९७४ मध्ये

वीज कनेक्शन दिले होते तथापि वेळोवेळी विजेचे बील देऊनही मे. किर्ती स्टील लिमीटेडने रक्कम भरली नाही म्हणून वि.प. यांनी मे. किर्ती स्टील विरूध्द थकबाकी वसुलीसाठी मा. सिव्हील जज्ज, सिनियर डिव्हीजन, सांगली यांचे कोर्टात स्पेशल सिव्हील सूट क्र. १०३/८५ दाखल केला होता. त्याकामी कोर्टाने दि ४/२/१९९१ रोजी आदेश पारीत करून मे. किर्ती स्टील लि. यांचेकडून रू. ७,९२,०६२=६५ व त्यावरील व्याज (वार्षीक हप्ता रू. १,००,०००/- व त्यावरील ६% व्याज याप्रमाणे ) वसुल करण्यासाठी वीज कंपनीचे बाजूने डिक्री बहाल केली होती. सदरच्या हुकुमनाम्यानुसार मे. किर्ती स्टील लि. यांनी दि. ३०/११/१९९१ रोजी एक लाख रूपये भरले व त्यानंतर त्यांनी थकबाकीपोटी रक्कम भरणा करण्याचे टाळले. त्यामुळे थकबाकीचे वसुलीसाठी मे. किर्ती स्टील लि. विरूध्द वि.प. यांनी दरखास्त दावा (स्पेशल दिवाणी मुकादमा नं १०३/८५) दिवाणी कोर्टात दाखल केला. सदरच्या मिळकतीमध्ये आपला हक्क संबंध असल्याचे सांगून अपीलदार यांनी दरखास्त दाव्यामध्ये पक्षकार करण्यासाठी दि. ४/८/२००६ रोजी दिवाणी कोर्टात अर्ज दाखल केला. या दरखास्त दाव्याचा निर्णय अद्यापि झालेला नाही. यावरून लिलाव मिळकतीवरील वीज मंडळाच्या थकबाकीची बाब न्यायप्रविष्ठ असून ती सध्या प्रलंबित असल्याचे दिसून येते. दरम्यानचे कालांत धनको स्टेट बँक ऑफ इंडियाने ऋणको मेसर्स किर्ती स्टील रि-रोलिंग मिल्स लि. विरूध्द कर्ज वसुलीसाठी ऋण वसुली अधिकरण पुणे (Debt Recovery Tribnal, Pune) यांचेकडे वसुली याचिका (Recovery Petition) क्रमांक ११७/२००१ दाखल केली. त्यास अनुसरून अधिकरणाने या मिळकतीचे लिलावाचा जाहिरनामा काढला. ही बाब वीज मंडळाचे निदर्शनास आल्यावरून त्यांनी अधिकरणाकडे संपर्क साधला. त्यावेळी अधिकरणाचे वसुली अधिका-याने दि. १७/९/२००४ रोजी अधीक्षक अभियंता, सांगली यांना पत्र पाठवून या मिळकतीवरील वीज मंडळाचे थकबाकी विषयी विचारणा करून त्याचा लिलावाचेवेळी विचार केला जाईल असे कळविले. त्याप्रमाणे वि.प. यांनी दि. २४/९/२००४ अखेर मे. किर्ती स्टील लि. कडे रू. ३६,६८,४०१=६४ थकबाकी असल्याचे अधिकरणास कळविले. तसेच दिवाणी कोर्टाकडील दि. ४/२/१९९१ चे आदेशानुसार वीज कंपनीची थकबाकी रू. ७,९२,०६२=६५ इतक्या रकमेचा बोजा दि. २६/११/२००४ रोजी या मिळकतीवर चढविल्याचे कळविले. त्यानंतर या मिळकमीचा लिलाव दि. २४/२/२००६ रोजी होऊन अपीलदार श्री. मगदुम यांचे नांवे दि. २७/३/२००६ रोजी कायम करण्यांत आला तसे Sale Certificate श्री. मगदुम यांचे नांवे देण्यात आले.

लिलावाचे कामी ऋण वसुली अधिकरणाने दि. २७/७/२००४ रोजी काढलेल्या जाहीरनाम्यांत खरेदीदार हे या मिळकतीशी जोडलेल्या Liability & Claim शी बांधील रहातील असे म्हटले आहे. शिवाय वीज मंडळाच्या थकबाकीचा बोजा लिलावापूर्वी म्हणजे दि. २६/११/२००४ रोजी या मिळकतीवर चढविण्यांत आल्याचे रेकॉर्डवरून स्पष्टपणे दिसून येते. यावरून सदरची मिळकत लिलावांत विकत घेताना अपीलदार यांना वि.प.च्या थकबाकीचे ज्ञान होते असे समजण्यास पुरेसा वाव आहे. त्यामुळे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कर्जाची रक्कम सोडल्यास ही मिळकत निर्वेध, निष्कर्जी व बिन-बोजाची असण्याची समजूत होऊन अपीलदाराने विकत घेतली आहे या त्यांच्या म्हणण्याशी मंच सहमत नाही. साहजिकच वि.प. यांनी मे. किर्ती स्टील लि. कडील वीज बिलाची थकबाकी विचारांत घेऊन अपीलदारास ती भरण्यासाठी कळविले असावे. त्याचे पूर्ततेनंतर त्यांना वीज कनेक्शन देण्याबाबत वि.प. कडून कार्यवाही करण्यांत येणर असल्याचे दिसते. वि.प. यांनी देखील मे. किर्ती स्टील लि. कडील वीज बिलाची थकबाकी वसुल करण्यासाठी काळजीपूर्वक तसेच तत्परतेने प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. मा. सिव्हील जज्ज, सिनियर डिव्हीजन, सांगली यांनी दि. ४/२/१९९१ रोजी आदेश करूनही थकबाकीचा बोजा मिळकतीचे रेकॉर्डवर ठेवण्यासाठी वि.प. यांना १३ वर्षापेक्षा जास्त (नोंद दि. २७/११/२००४) कालावधी लागला. तसेच दिवाणी कोर्टाच्याया आदेशानंतर मे. किर्ती स्टील लि.ने फक्त एकच हप्ता दि. ३०/११/१९९१ रोजी भरणा केला. त्यानंतर त्यांनी थकबाकीचा हप्ता भरण्याचे टाळले. तरीही वि.प. यांना दिवाणी कोर्टाचे आदेशानुसार थकबाकी वसुलीची दरखास्त दाखल करण्यास सुमरे साडे तीन वर्षाचा कालावधी लागला. सदरचा दरखास्त दावा अद्याप प्रलंबित आहे. अपीलदाराने पूर्वीच्या मालकाकडे / वहिवाटदाराकडे असलेली सर्व थकबाकी भरणे

आवश्यक असल्याची तरतूद वि.प. यांनी मंचास दाखवून दिलेली नाही. त्यामुळे कलम १०.५ च्या तरतुदीप्रमाणे नवीन ग्राहकाने जास्तीत जास्त सहा महिन्याची थकबाकी भरल्यानंतर उर्वरित रक्कम ही पूर्वीचे ग्राहकाकडून वि.प.ने वसु करण्यास मंचाची कसलीही हरकत नाही. शिवाय त्या वसुलीसाठी वि.प. हे या पूर्वीच दिवाणी कोर्टात गेले आहेत.

दरम्यान दि. १०/७/२००७ रोजी अधीक्षक अभियंता, सांगली यांनी श्री. मगदुम यांना पत्र पाठवून सुप्रिम कोर्टात प्रलंबित असलेल्या याच विषयाच्या परंतू अन्य पक्षकारामधील दाव्याचा निकाल आपल्यावर बंधनकारक राहील असे हमीपत्र देण्यास सांगितले आहे. तसेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ चे कलम १०.५ नुसार तात्पुरते बंद असलेल्या तारखेच्या पूर्वीचे ६ महिन्याचे बील त्यावरील चालू दराप्रमाणे होणारे व्याज व विलंब आकार तक्रारदाराने भरणे आवश्यक आहे असे कळविले आहे. सदरचे पत्रात पुढे असे नमूद केले आहे की याची पूर्तता केल्यानंतर कनेक्शन देण्याबाबतचा प्रस्ताव मुख्य अभियंता, परिमंडळ कार्यालय कोल्हापूर यांना पाठविला जाईल. वीज मंडळाच्या थकबाकीची येणेप्रमाणे सद्य:स्थिती असल्याचे पाहिल्यानंतर अपीलदार यांनी या मिळकतीवर घरगुती वापरासाठी सिंगल फेज कनेक्शन मिळण्याबाबत केलेल्या विनंतीशी, त्यांचे म्हणण्यानुसार, निगडीत असलेल्या विद्युत कायदा २००३ चे कलम ४३ व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ चे कलम १०.५ च्या तरतूदी पहाणे गरजेचे वाटते. विद्युत कायदा २००३ कलम ४३ चे तरतूदी नुसार एखाद्या जागेच्या मालकाने अगर वहिवाटदाराने नवीन वीज कनेक्शन मिळण्यासाठी परिपूर्ण अर्ज केला असेल तर त्यास वितरण परवानेधारकाने एक महिन्याचे मुदतीत अगर विद्युत आयोगाने विहीत केलेल्या मुदतीत कनेक्शन देणे आवश्यक आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ चे कलम १०.५ चे तरतुदीनुसार विजेचा आकार किंवा विजेच्या आकाराशिवाय अन्य कोणतीही वितरण परवानाधारकास देय असलेली रक्कम आदा करणे बाकी राहिले असेल तर त्या जागेचा नवीन मालक (कायदेशीर वारसा व्यतिरिक्त) जास्तीत जास्त सहा महिने अगोदर पर्यंतच्या कालावधींत फक्त अशा जागेला पुरविण्यांत आलेल्या विजेच्या चुकत्या न केलेल्या आकारास जबाबदार राहतो. या तरतुदीचा विचार केल्यास अपीलदार श्री. मगदुम हे वि.प.च्या सर्व थकबाकीस जबाबदार राहू शकत नाही. श्री पारकर, अपीलदाराचे प्रतिनिधी यांनी सुनावणीचेवेळी ग्राहक तक्रार निवारणमंच, भांडुप यांनी अशाच एका प्रकरणी (केस नं ११७ दि. ३०/४/२००७) दिलेल्या निर्णयाची प्रत सादर केली. त्यामधील वस्तुस्थिती व प्रस्तुतचे प्रकरणांतील वस्तुस्थिती (fact) एकसारखी असल्याची खात्री मंचाने केली. या आदेशानुसार ग्राहकास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ चे कलम १०.५ प्रमाणे जास्तीत जास्त सहा महिन्याची थकबाकी भरणा करण्यास व त्याची पूर्तता केल्यानंतर त्यांना वि.प. यांनी कनेक्शन द्यावे असे सांगितले आहे. त्यानुसार महावितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता यांनी नवीन ग्राहकास देय रक्कम भरणा करण्यासाठी कळविले आहे. त्याचे पूर्ततेनंतर ग्राहकाने मागणी केल्या प्रमाणे त्यांना वीज कनेक्शन देण्यात आले. श्री. मगदुम हे वरील प्रमाणे फक्त सहा महिन्याच्या कालावधींतील थकबाकी भरण्यास बांधील आहेत त्यास त्यांची मान्यता आहे. उर्वरीत थकबाकी मुळ मालकाकडून भरून घेण्यास वि.प. सक्षम आहेत. अधीक्षक अभियंता, सांगली यांचेकडील दि. १०/७/२००७ चे पत्रावरून ही बाब वि.प. यांनाही मान्य असावी असे वाटते. प्रश्न उरतो तो अधीक्षक अभियंता, सांगली यांनी सदरचे पत्रामध्ये नमूद केलेल्या मा. सुप्रिम कोर्टातील प्रलंबित प्रकरणामध्ये होणा–या निकालाचा व त्या अनुषंगाने अपीलदाराने हमीपत्र लिहून देण्याचा. श्री. मगदुम यांना घरगुती वापरासाठी सिंगल फेजचे नवीन वीज कनेक्शन देतांना वि.प. यांनी " सुप्रिम कोर्टाचे निर्णयास अधिन राहून " असा उल्लेख केल्यास ग्राहकाकडून वेगळे हमीपत्र घेण्याचे कारण उरणार नाही. उलटपक्षी त्यामुळे ग्राहकाच्या तक्रारीचे निवारण होण्यास मदत होईल अशी मंचाची धारणा आहे.

प्रकरणी दि. १७/८/२००७ रोजी सुनावणी केल्याचेवेळी श्री. बी.डी. नाईकवाडी हे मंचाचे सदस्य–सचिव म्हणून उपस्थित होते. त्यानंतर दि. ३१/८/२००७ रोजी त्यांची सेवानिवृत्ती झाल्याने प्रस्तुतची आदेश अध्यक्ष व सदस्य यांचे सहीने पारीत केला आहे.

## आदेश

१. मे. किर्ती स्टील रि–रोलिंग मिल्स लि. या ग्राहकाकडील जास्तीत जास्त मागील सहा महिन्याची थकबाकी वि.प. यांनी अपेलंट श्री. मगदुम यांना कळवावी.

२. सदरच्या रक्कमेचा भरणा व अर्जाची पूर्तता श्री. मगदुम यांनी केल्यानंतर त्यांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ चे तरतुदीनुसार विहीत मुदतीत वीज कनेक्शन देण्यांत यावे.

३. सदरच्या आदेशाची अंमलबजावणी करून तसे केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ८.७ चे तरतुदीनुसार मंचास दिनांक ३१–१०–२००७ पर्यंत कळवावे.

४. या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल “केशवा” बांद्रा–कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–४०००५१ यांचेकडे करता येईल.

( जी. सी. लेले )
सदस्य
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर

( के. व्ही. पाटील )
अध्यक्ष
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर

श्री पारकर, अपीलदाराचे प्रतिनिधी यांनी सुनावणीचेवेळी ग्राहक तक्रार निवारणमंच, भांडुप यांनी अशाच एका प्रकरणी (केस नं ११७ दि. ३०/४/२००७) दिलेल्या निर्णयाची प्रत सादर केली. त्यामधील वस्तुस्थिती व प्रस्तुतचे प्रकरणांतील वस्तुस्थिती (fact) एकसारखी असल्याची खात्री मंचाने केली. या आदेशानुसार ग्राहकास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ चे कलम १०.५ प्रमाणे जास्तीत जास्त सहा महिन्याची थकबाकी भरणा करण्यास व त्याची पूर्तता केल्यानंतर त्यांना वि.प. यांनी कनेक्शन द्यावे असे सांगितले आहे. त्यानुसार महावितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता यांनी नवीन ग्राहकास देय रक्कम भरणा करण्यासाठी कळविले आहे. त्याचे पूर्ततेनंतर ग्राहकाने मागणी केल्या प्रमाणे त्यांना वीज कनेक्शन देण्यात आले.

श्री. मगदुम यांनी दि. १७/७/२००६ रोजी वीज कनेक्शन मागणीचा अर्ज केला आहे. सदरच्या मागणीस महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ मधील तरतूदी लागू होतात. कारण या तरतूदीची अंमलबजावणी दि. २० जानेवारी २००५ पासून करण्यांत आली आहे.

-------

अपीलदाराने पूर्वीच्या मालकाकडे / वहिवाटदाराकडे असलेली सर्व थकबाकी भरणे आवश्यक असल्याची तरतूद वि.प. यांनी मंचास दाखवून दिलेली नाही. त्यामुळे कलम १०.५ च्या तरतुदीप्रमाणे नवीन ग्राहकाने जास्तीत जास्त सहा महिन्याची थकबाकी भरल्यानंतर उर्वरित रक्कम ही पूर्वीचे ग्राहकाकडून वि.प.ने वसु करण्यास मंचाची कसलीही हरकत नाही. शिवाय त्या वसुलीसाठी वि.प. हे या पूर्वीच दिवाणी कोर्टात गेले आहेत.

-------

## आदेश

३. मे. किर्ती स्टील रि-रोलिंग मिल्स लि. या ग्राहकाकडील जास्तीत जास्त मागील सहा महिन्याची थकबाकी वि.प. यांनी अपेलंट श्री. मगदुम यांना कळवावी.

४. सदरच्या रक्कमेचा भरणा व अर्जाची पूर्तता श्री. मगदुम यांनी केल्यानंतर त्यांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ चे तरतुदीनुसार विहीत नमुदतीत वीज कनेक्शन देण्यांत यावे.

१. सदरच्या आदेशाची अंमलबजावणी करून तसे केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ८.७ चे तरतुदीनुसार मंचास दिनांक ३१-१०-२००७ पर्यंत कळवावे.

२. या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल "केशवा" बांद्रा-कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रा (पूर्व),मुंबई-४०००५१ यांचेकडे करता येईल.

| | |
|---|---|
| ( जी. सी. लेले ) | ( के. व्ही. पाटील ) |
| सदस्य | अध्यक्ष |
| ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर |